# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२१४ दिनांक-३१/०५/२०२४

## अनोळखी महिलेच्या खुनाचे रहस्य उलगडुन आरोपीत यास ७२ तासात दिल्ली येथुन अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. २८/०५/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा.चे पुर्वी धोदाडा डोंगराच्या खाली असलेल्या ओव्हळात हरवटेपाडा, धानिवबाग नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे एक अनोळखी महिला वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, अंगात नेसुस गुलाबी रंगाची पंजाबी सलवार सुट व त्यावर चॉकलेटी (वांगी) रंगाचा नकाब असे परिधान केलेल्या महिलेच्या मानेवर, छातीवर कोणत्या तरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन लोखंडी चाकुने अगर कोणत्या तरी अन्य धारदार शस्त्राने वार करुन तिचा खुन करुन पुरावा नष्ठ करण्याच्या उद्देशाने सदर अनोळखी महिलेचे प्रेत धोदाडा डोंगराच्या खाली असलेल्या डोंगराचे ओव्हळात, ता. वसई जि.पालघर येथे आणून टाकले बाबत श्री. दिलीप रामचंद्र हरवटे, वय ४९ वर्षे, धंदा- शेती, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, हरवटेपाडा, धानिवबाग, ता. वसई, जि. पालघर यांचे तक्रारी वरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ५०४/२०२४ कलम ३०२, २०१ भा. दं. वि. सं. प्रमाणे दिनांक २८/०५/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी स्वतः हाती घेऊन सदर गुन्हयाच्या तपासाची सुरुवात केली.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेऊन श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, व वरिष्ठांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट देऊन मयत महिलेची ओळख पटवुन सखोल तपास करुन मयत महिलेच्या वारसाचा शोध घेऊन तिची ओळख पटवुन अज्ञात आरोपीताचा शोध घेणेबाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांचेसह गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. सोपान पाटील, व गुन्हे प्रकटीकरण पथकास योग्य त्या सुचना देऊन मार्गदर्शन केले.

मा.वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे श्री. जितेंद्र वनकोटी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेसह गुन्हे प्रकटीकरण पथकाचे श्री. सोपान पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, व गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी घटनास्थळावर मयत महिलेच्या मृतदेहाजवळ वापरलेले एक कंडोम व Universal STUD 5000 for man in you हा स्प्रे ( सेक्ससाठी वापरत असल्याने ) मिळुन आल्याने ते अज्ञात आरोपीने सदर परीसरातीलच मेडीकल शॉपमधुन विकत घेतला असल्याची शक्यता असल्याने गुन्हे प्रकटीकरणचे अधिकारी व कर्मचारी यांनी धानीवबाग परीसरातील प्रत्येक मेडीकलमध्ये जाऊन बॅच नं. E896, 02/2024 बाबत तपास सुरु केला. तेव्हा धानिवबाग परिसरातील एका मेडीकल शॉपमधुन अज्ञात आरोपीत याने सदर कंडोम व Universal STUD 5000 for man in you हा स्प्रे खरेदी करत असल्याचे समजले. सदर शॉपमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता असता दि. २४.०५.२०२४ रोजी सकाळी ०८.४५ वाजता एक अनोळखी इसम एक कंडोम व नमुद प्रॉडक्ट विकत घेवुन जात असताना दिसुन आला.

तसेच सदर प्रकरणाती मयत महिलेच्या मृतदेहाची ओळख पटविण्या करीता नालासोपारा पूर्व परीसरातील मतदार यादया प्राप्त केल्या. मयत महिलेच्या पेहरावावरुन ती मुस्लीम असल्याचे वाटत असल्याने सदर मतदार यादीतील मुस्लीम महिलांचे नावांची शॉर्टलिस्ट तयार करून प्रत्येक घर शोधण्यास सुरुवात केली. त्याप्रमाणे धानीवबाग तलाव येथे राहणाऱ्या जियाउल्लाह म्हातावु शाह याचे घरी दोन लहान मुले दिसुन आली. व त्यांचे सोबत कोणीही नव्हते त्यामुळे आजुबाजुस अधिक तपास केला असता जियाउल्लाह म्हातावु शाह हा पोलीस ठाण्यात गेला असून त्याची पत्नी हि सुमारे तीन दिवसापासुन बेपत्ता असल्याचे समजले. त्यामुळे इसम नामे श्री. जियाउल्लाह म्हातावु शाह वय ३२ वर्ष रा. धानिवबाग तलावाजवळ, यांची भेट घेवुन त्यांना मयत महिलेचे फोटो दाखवले असता त्यांनी सदरची मयत महिला हि त्यांची पत्नी सौ. सायरा बानु जियाउल्लाह शाह वय- ३४ वर्ष असे असल्याचे सांगितले.

लागलीच त्यास मेडीकल शॉप मध्ये मिळून आलेल्या अनोळखी इसमाचे सीसीटीव्ही फुटेज दाखवले असता त्याने सदर इसम हा त्यांचा भाचा - नजाबुद्दीन मोहम्मद सम्मी, वय- २१ वर्षे, सध्या रा. अमनविहार दिल्ली मुळ रा. ग्राम गौरडिह, पो. धोबहा, तहसिल इटावा, जि.सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश मो.नं ९६२५६०७२९३ हा असल्याचे सांगुन त्यांची मयत पत्नी व भाचा नजाबुद्दीन यांचे सुमारे दोन वर्षापासुन अनैतिक संबंध असल्याचे सांगितले. इसम नजाबुद्दीन याचे मोबाईल फोनचे तांत्रिक माहितीच्या आधारे माहिती प्राप्त करुन लागलीच सपोनि/सोपान पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथकाची टिम दिल्ली येथे रवाना केली. त्यांनी इसम नजाबुद्दीन मोहम्मद सम्मी, यांचा स्थानिक पोलीसांच्या मदतीने दिल्ली येथिल अमनविहार पोलीस ठाणे हद्दीत त्यांचा शोध घेत असतांना आरोपीत हा बेकरीमध्ये काम करत असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी रात्रौभरात सुमारे ९० ते १०० बेकऱ्या तपासुन आरोपीत याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेतले. त्याचेकडे अधिक तपास केला असता त्यानेच मयत महिलेस अनैतिक संबंधावरुन आपसात वाद झाल्याने दिनांक २७/०५/२०२४ रोजी १२.३० वा. च्या सुमारास एका धारदार चाकुने तिचा गळा चिरुन छातीत चाकु खुपसुन जिवेठार मारुन पळून गेला असल्याबाबत सांगितले. सदर आरोपीत यांस दिनांक ३१/०५/२०२४ रोजी अटक करुन गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. विजय लगरे सो., सहा.पो.आयुक्त सो. नालासोपारा विभाग, अति चार्ज विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकिल शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, सफौ/सुरेंद्र शिवदे, बाळासाहेब घुटाळ, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, मिथुन मोहिते, संजय मासाळ, किरण आव्हाड, राहुल कर्पे, अभिजीत नेवारे, निखील मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सर्व नेमणुक पेल्हार पोलीस ठाणे, तसेच पोहवा/नामदेव ढोणे, पोअंम./सोहेल शेख नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ३, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

